मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पब, बार आणि रेस्टॉरंटवर धडक कारवाई

## जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रानंतर पीएमआरडीएला जाग : हिंजवडीतील 10 हॉटेल्स, पब, रेस्टोवर केली कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) गुरुवारी सकाळीच हिंजवडी येथील अनधिकृत १० बार अँड रेस्टो आणि रूफ टॉप हॉटेलवर बुलडोझर फिरवण्यात आला. गेल्या सहा महिन्यांपासून थंड असलेल्या प्राधिकरणाच्या अतिक्रमण विरोधी पथकाने ही कारवाई केली कारण याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांची कानउघडणी केली आहे. कान टोचल्यानंतर प्राधिकरणाला जाग आली असून कारवाईचा धडाका सुरू केला आहे. आज केलेल्या कारवाईत जवळपास ९७ हजार ८१५ चौरस फुटाचे बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.



गेल्या अनेक दिवसांपासून पीएमआरडीए अतिक्रमण विरोधी पथकाला पूर्ण वेळ अधिकारी मिळत नव्हता. परिणामी, सुनावण्या आणि अतिक्रमण कारवाई थंड झाली होती. पीएमआरडीएचे अधिकाऱ्यांना तात्पुरता चार्ज प्राधिकरणातील दोन अधिकाऱ्यांना देण्यात आला होता. त्यामुळे या विभागास कोणीही वाली नव्हता. दरम्यान, निवडणुकीच्या काळात या अतिक्रमण विभागास अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार गेल्या आठवड्यात संबंधित अधिकाऱ्यांनी याची माहिती घेतली. निवडणुकीच्या काळात आचारसंहितेमुळे कारवाई करता येत नव्हती. मंगळवारी मतमोजणी पार पडली. गुरुवारी सकाळपासून सात पासून ही कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी या ठिकाणी उपस्थित होते.

जानेवारी महिन्यामध्ये महाळुंगे परिसरातील अतिक्रमण व कारवाई केली होती. तर, ऑक्टोबर २०२३ मध्ये हिंजवडी परिसरातील लक्ष्मी चौक या ठिकाणी अतिक्रमण काढले होते. त्यानंतर आता म्हणजे जवळपास सहा महिन्यांनी कारवाई करण्यात आली. त्यात हिंजवडी (ता. मुळशी) येथील गट नंबर २१, २८, २९ मधील ०८ अनधिकृत बार अँड रेस्टो व २ रूफ टॉप बार अँड रेस्टोवर निष्कासन कारवाई सुरू करण्यात आली. कारवाई पूर्ण दिवस सुरू होती. या ठिकाणचे ९७, ८१५ चौ.फूट क्षेत्रावरील अनधिकृत पब, रेस्टॉरंट व बार पोकलेन, जेसीबी व मनुष्यबळाच्या साहाय्याने पाडण्यात आले. अशीच कारवाई इथून पुढे सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले. पीएमआरडीएचे महानगर आयुक्त राहुल महिवाल व अति. महानगर आयुक्त दीपक सिंगला यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई केली. यावेळी उपस्थित पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकाम करू नये, असे आवाहन केले आहे.

### ही आहेत कारवाई केलेली हॉटेल्स

» हॅपी दा पंजाब, हशश कॅफे बार, रिओ किचन अँड बार, फवेरा गॅस्ट्रो बार, मरिन ड्राईव्ह स्काय बार, हॉटेल एफ एम एल, बिलेनियर रेस्टो बार, द कम्युनिटी टेबल, एजंट जॅक्स, डी हेम्स.

> आज सकाळपासून या ठिकाणी कारवाई सुरू होती. प्राधिकरण हद्दीतील उर्वरित सर्व पब, बार व रेस्टॉरंट्स यांचा सर्व्हे चालू असून अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई सुरूच राहणार आहे.
> - अनिल दौंडे, सह-आयुक्त, अतिक्रमण व निर्मूलन पथक, पीएमआरडीए

# चिखलीतील दोन रबर कंपन्या आगीत भस्मसात

## महापालिकेकडून नोटीस बजावूनही दुर्लक्ष : आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील दोन रबर कंपन्या आगीत भस्मसात झाल्या. गुरुवारी सकाळी ही घटना घडली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.चिखली-पवार वस्ती येथे वीरभ सस्पेंशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची पाच हजार चौरस फुटामध्ये तीन शेड आहेत. आर. के. ट्रेडर्स या कंपनीचे दोन हजार चौरस फुटामध्ये एक शेड आहे. दोन्ही कंपन्यांमध्ये रबरपासून विविध प्रकारची साधने बनवली जातात.



गुरुवारी सकाळी वीरभ सस्पेंशन कंपनीत आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच महापालिका मुख्य अग्निशमन केंद्रासह चिखली, तळवडे, प्राधिकरण, पिंपरी, थेरगाव, मोशी अग्निशमन केंद्राचे ११ बंब घटनास्थळी दाखल झाले. ५९ जवानांनी दुपारी साडेबारापर्यंत आग आटोक्यात आणली. मात्र, रबर मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आग धुमसत होती. त्यामुळे खबरदारी म्हणून अग्निशमन बंब तैनात ठेवले होते. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

### नोटीस बजावूनही दुर्लक्ष

» महापालिकेच्या अग्निशामक विभागाकडून व्यवसाय अग्नी सुरक्षितता सर्वेक्षणामध्ये या दोन्ही कंपन्यांना दोन वेळा नोटीस बजावण्यात आल्या होत्या. मात्र, या कंपन्यांनी कोणत्याही प्रकारची अग्निसुरक्षिततेची पूर्तता केली नसल्याचे दिसून आले आहे. अग्नी सुरक्षितता नियमांचे पालन न केल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचेही या ठिकाणी दिसून आले. त्यामुळे या कंपन्यांवर कारवाईची शक्यता आहे.

# अल्पवयीन आरोपीच्या आजोबांची हायकोर्टात धाव

## अल्पवयीन मुलगा, वडील विशाल अग्रवाल, आजोबा सुरेंद्र अग्रवाल आणि आई शिवानी अग्रवाल चौघेही सध्या तुरुंगात

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणीनगर येथे अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत भरधाव वेगाने पोर्श कारन चालवता बाईकला धडक दिली, त्यामध्ये दोघांचा मृत्यू झाला. याप्रकरणात आत्तापर्यंत १० जणांना अटक करण्यात आली आहे. अपघातास जबाबदार अल्पवयीन मुलगा, तसेच त्याचे वडील विशाल अग्रवाल, आजोबा सुरेंद्र अग्रवाल आणि आई शिवानी अग्रवाल हे चौघेही सध्या तुरूंगात आहे. त्यांच्याशिवाय या गुन्ह्यातील पुरावे नष्ट करण्यास मदत करणारे, अल्पवयीन मुलाच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार करण्यास मदत करणाऱ्या इतरांनाही पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान या प्रकरणात सध्या तुरूंगात असलेले अल्पवयीन मुलाचे आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.



सुरेंद्र अग्रवाल यांनी पुणे पोलिसांच्या विरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. पुणे पोलिसांनी आपल्याला चुकीच्या पद्धतीने अटक केली आहे. माझ्यावर केवळ चुकीचे आरोप करत या गुन्ह्यात अडकवण्यात आल्याचा दावा सुरेंद्र यांनी केला आहे. याप्रकरणी सुरेंद्र यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखली आहे. आता याप्रकरणावर न्यायालय काय निर्देश देते, सुरेंद्र अग्रवाल यांना दिलास मिळतो की त्यांना तुरूंगातच रहावे लागते हे न्यायालयाच्या निर्देशानंतर स्पष्ट होईल. कल्याणी नगर अपघात प्रकरणी ड्रायव्हरला डांबून ठेवत अपहरण केल्याचा आरोप सुरेंद्र अग्रवाल यांच्यावर आहे.

### नेमकं काय घडलं?

19 मे रोजी मध्यरात्री अल्पवयी मुलाने पबमध्ये जाऊन पार्टी केली, मद्यप्राशनही केले. त्यानंतर त्याने दारूच्या नशेतच पोर्श कार भरधाव वेगाने चालवली आणि एका बाईकला जोरदार धडक दिली. यामध्ये इंजिनिअर तरूण-तरूणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर अल्पवयीन आरोपीला अटक करण्यात आली. त्यानंतर त्याचे वडील विशाल अग्रवाल आणि आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. या अपघाताची जबाबदारी स्वत:च्या अंगावर घे, असा दबाव त्या दोघांनी त्यांच्या ड्रायव्हरवर टाकल, त्यासाठी त्याचे अपहरण करून त्याला डांबून ठेवले असा आरोपही त्यांच्यावर आहे.

एवढंच नव्हे तर जबाब बदलण्यासाठी सुरेंद्र अग्रवाल यांच्याकडून ड्रायव्हरवर दबाब आणण्यात आला. यापूर्वी पोलिसांनी सुरेंद्र अग्रवाल यांची चौकशी केली. सुरेंद्र अग्रवाल यांचे अंडरवर्ल्डशी कनेक्शन असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्यांना पोलिसांनी बोलावलं होते. आता नातू, मुलगा , आजोबा आणि सून हे चौघेही तुरुंगात आहेत. पोलिसांनी सुरेंद्र अग्रवाल यांच्या घरावरही छापेमारी केलीये. सीसीटीव्ही फुटेजसोबत छेडछाड करण्यात आल्याचीही माहिती मिळाली आहे.

### काय आहे पुणे कार अपघात प्रकरण?

» पुण्यात 19 मे रोजी एका महागड्या पोर्शे कारचा अपघात झाला होता. या अपघातात अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्टा या दोघांचा मृत्यू झाला होता. ही महागडी गाडी अल्पवयीन मुलगा चालवत होता, असा दावा केला जातो. त्यानंतर हे प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न झाल्याचेही म्हटले जाते. त्याच्या रक्ताचेहू नमुने बदलण्यात आले होते. याच कारणामुळे या प्रकरणाची मोठी चर्चा झाली. त्यानंतर आता पोलिसांच्या तपासात या प्रकरणात अनेक खुलासे होत आहेत.

# पुणे मेट्रो सुसाट! स्वारगेटपर्यंत धावण्याचा मुहूर्त ठरला

## पुणे मेट्रोच्या रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या विस्तारित मार्गामुळे मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होत आहे. जानेवारीच्या तुलनेत प्रवासी संख्येत मे महिन्यात सुमारे ९ लाखांची वाढ झाली आहे. यामुळे मेट्रोची सरासरी दैनंदिन प्रवासी संख्या आता ९० हजारांवर पोहोचली आहे. दरम्यान, स्वारगेटपर्यंत मेट्रो धावण्यासाठी सप्टेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.



रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे ६ मार्चला केले. तेव्हापासून मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होत आहे. विस्तारित मार्ग सुरू होण्याआधी मेट्रोची प्रवासी संख्या जानेवारी महिन्यात १७ लाख ५५ हजार, फेब्रुवारीत १७ लाख ७६ हजार होती. विस्तारित मार्ग सुरू झाल्यानंतर मार्चमध्ये प्रवासी संख्या २२ लाख ५८ हजारांवर गेली. त्यानंतर प्रवासी संख्येतील वाढ कायम राहून ती एप्रिलमध्ये २३ लाख ८१ हजार आणि मेमध्ये २६ लाख १६ हजारांवर पोहोचली आहे.

मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या जानेवारी महिन्यात सुमारे ६० हजार होती रामवाडीपर्यंत विस्तारित मार्ग सुरू झाल्यानंतर दैनंदिन प्रवासी संख्या ९० हजारांवर पोहोचली आहे. विस्तारित मार्ग सुरू होण्याआधी मेट्रोचे दैनंदिन उत्पन्न सुमारे १० लाख रुपये होते. आता मेट्रोचे दैनंदिन उत्पन्न १४ लाख रुपयांवर पोहोचले आहे. मे महिन्यात मेट्रोला एकूण ४ कोटी २४ लाख ७६ हजार ४८० रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

सध्या पुणे मेट्रोची सेवा पिंपरी-चिंचवड ते जिल्हा न्यायालय आणि वनाझ ते रामवाडी या दोन मार्गांवर सुरू आहे. वनाझ ते रामवाडी मार्गावरील रुबी हॉल ते रामवाडी हा विस्तारित टप्पा मार्चमध्ये सुरू झाला. त्यावर बंडगार्डन, येरवडा, कल्याणीनगर आणि रामवाडी ही स्थानके आहेत. हा मार्ग ५.५ किलोमीटरचा आहे. याचबरोबर पिंपरी-चिंचवड ते जिल्हा न्यायालय मार्ग पुढे स्वारगेटपर्यंत जाणार आहे. या भूमिगत मार्गाचे काम सुरू असून, तो सप्टेंबर महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. हा मार्ग ३.६४ किलोमीटरचा आहे, अशी माहिती महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी दिली.

### मेट्रो प्रवासी संख्या

जानेवारी – १७ लाख ५५ हजार
फेब्रुवारी – १७ लाख ७६ हजार
मार्च – २२ लाख ५८ हजार
एप्रिल – २३ लाख ८१ हजार
मे – २६ लाख १६ हजार

### येरवडा स्थानक जुलैमध्ये सुरू होणार

» वनाझ ते रामवाडी मेट्रो मार्गावरील येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराचा एक जीना नगर रस्त्यात येत असल्याने महापालिकेने तो दुसरीकडे हलविण्यास सांगितले होते. त्यानुसार महामेट्रोकडून जीना दुसरीकडे करण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे या मार्गावरील सेवेतून येरवडा स्थानक सध्या वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे स्थानक जुलै महिन्याच्या अखेरीस सुरू होणार आहे. हे स्थानक सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत आणखी वाढ होणार आहे.

# खोळंबलेल्या विकासकामांचा मार्ग मोकळा

## पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी प्रशासन ॲक्शन मोडवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेली आचारसंहिता तब्बल तीन महिन्यांनी शिथील करण्यात आली आहे. अर्थात नव्या सरकार स्थापनेनंतर पूर्णत: उठवली जाणार आहे. यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, एमआयडीसी आदी आस्थापनांची आचारसंहितेमुळे खोळंबलेली विकासकामे मार्गी लावण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

अठराव्या लोकसभेच्या ५४३ सदस्यांच्या निवडीसाठी देशात १९ एप्रिल ते १ जून या कालावधीत सात टप्प्यात जाहीर झालेल्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. अंतिम निकाल जाहीर होऊन विजयी उमेदवारांची यादी देखील केंद्रीय निवडणूक आयोगाने आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. या निवडणुकीसाठी जारी केलेली आचारसंहिता केंद्रीय निवडणूक विभागाकडून आज गुरुवारी (दि. ६) शिथील करण्यात आली.

सर्वाधिक पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांचे १०० टक्के काम झाल्याचा दावा प्रशासनाने केला असला, तरी अद्याप ८४ किलोमीटर लांबीच्या गटारांची आणि १४ हजार चेंबरची स्वच्छता बाकी आहे. अनेक ठिकाणी चेंबरच्या झाकणात अडकलेली माती, कचरा काढण्यात कामाचा दर्जाही राखलेला नाही

प्राथमिक आणि माध्यमिकच्या १२० शाळांची स्वच्छता, दिव्यांगांच्या साधनांचे वाटप, विद्यार्थ्यांना डीबीटी अर्थसहाय्य, दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना अर्थसहाय, दिव्यांग भवन शंभर टक्के कार्यान्वित करणे, शाळांची स्थापत्यविषयक दुरुस्तीची कामे, सीसीटीव्ही कार्यान्वित करणे, बीआरटी बसस्टॉपमध्ये सीसीटीव्ही बसविणे, चिखलीतील टाऊन हॉल सुरु करणे आदी नागरिकांशी निगडीत असणाऱ्या कामांना आता गती मिळणे अपेक्षित आहे.

त्याचबरोबर प्रभागनिहाय नवीन स्व. बाळासाहेब ठाकरे दवाखाने सुरु करणे, नवीन थेरगाव रुग्णालयामध्ये कॅन्सर रुग्णालय सुरु करणे, यशवंतराव चव्हाण रुग्णालय, जिजामाता रुग्णालय, तालेरा रुग्णालयात सुधारणा करणे, त्याचबरोबर पिंपरी ते निगडी आणि शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम मार्गी लावणे, रस्त्याची कामे मार्गी लावणे, भक्ति-शक्ति ते रावेत पुढे विकास नगर किवळे बीआरटी रस्ता विकसित करणे, काळेवाडी-आळंदी-देहू बीआरटी मार्गावरील ऑटो क्लस्टर येथील एमआयडीसी हद्दीतील रस्ता विकसित करणे, अर्बन स्ट्रीट डिझाइन अंतर्गत पदपथांची सुधारित रचना करणे, उद्याने तसेच नाट्यगृहातील सुधारणा आदी कामे मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आता वेळ मिळणार आहे.




### आचारसंहिता काळात विकास प्रकल्पांना खीळ

» आचारसंहिता काळात पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए आणि एमआयडीसीच्या विकास प्रकल्पांना खीळ बसली. प्रस्तावित विकास कामांच्या निविदा आहे त्या स्थितीत थांबवून फाइल बंद करुन ठेवाव्या लागल्या. अधिकारी, कर्मचारी वर्ग निवडणूक कामकाजात व्यस्त झाल्याने नागरिकांची कामे खोळंबली. नागरिकांचे प्रश्न क्षेत्रीय कार्यालय स्तरावर सोडविण्यासाठी सुरु केलेली जनसंवाद सभा देखील रद्द करण्यात आली.

### जनसंवाद सभेची प्रतीक्षा

» नगरसेवकांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने नागरिकांचे प्रश्न कोण सोडवणार? याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. नागरिकांचे प्रश्न सोडविण्यात कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात महिन्याच्या दर सोमवारी जनसंवाद सभा घेण्यास सुरुवात केली. त्यामध्ये नागरिकांना स्वतः उपस्थित राहून त्यांच्या समस्या मांडण्यात येत होत्या. पुढे आयुक्त शेखर सिंह यांनी ही जनसंवाद सभा महिन्यातून दोनवेळा घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे नागरिकांचे प्रश्न सोडविण्यास काही प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या. लोकसभेची आचारसंहिता लागू झाल्यानंतर या जनसंवाद सभा रद्द करण्यात आल्या. आता ही जनसंवाद सभा कधी सुरु होणार ? याची नागरिकांना प्रतीक्षा आहे

# शहरातील नालेसफाईच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह

## उड्डाणपूल, मोठ्या इमारतींचा येत्या सात दिवसांत सुरक्षा अहवाल सादर करा : आयुक्तांचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात मंगळवारी ढगफुटी होऊन आपत्ती निवारणाचा प्रश्न निर्माण झाल्याने आयुक्तांनी तातडीने रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्गावरील वाहतुकीला होणारे अडथळे दूर करण्यासाठी त्याठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी.

उड्डाणपूल, मोठ्या जुन्या इमारती आदी ठिकाणी पक्षांच्या बीज वहनामुळे वाढलेली झाडे-झुडपे तातडीने काढू टाकावीत, पुलावरील पावसाचे पाणी जाण्यासाठी अडसर ठरणारा कचरा काढून स्वच्छता करण्यात यावी. येत्या सात दिवसांत याचा अहवाल सादर करण्याचे आदेश आयुक्त शिखर सिंह यांनी स्थापत्य विभागाला दिले आहेत.

दोनच दिवसांपूर्वी आयुक्तांनी शहरातील नाल्यांच्या साफसफाईची स्वतः शहरात फिरून पाहणी केली. त्यावेळी काही त्रुटी लक्षात आल्याने त्यांनी त्याचक्षणी आरोग्य विभागाचे उपायुक्त यशवंत डांगे यांना स्वच्छता करुन घेण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आयुक्तांनी शहरातील उड्डाणपूल, भुयारी मार्ग, मोठ्या इमारतींची तपासणी करुन संभाव्य आपत्तीसदृष्य परिस्थितीचा आढावा घ्यावा.

पक्षांमार्फत बीज वहनामुळे उगवलेली झाडे-झुडपे काढून टाकण्यात यावीत. उड्डाण पुलावरील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी असणा-या व्यवस्थेतील कचरा काढून स्वच्छता करावी. याबाबत सविस्तर अहवाल तयार करुन सात दिवसांच्या आत आयुक्त कार्यालयात व आपत्ती व्यवस्थापन कक्षात अहवाल सादर करण्यात यावा, असे आदेश स्थापत्य विभागाला देण्यात आले आहेत.



### आपत्ती निवारणाच्या दृष्टीकोनातून आढावा

» दोन दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसाने भोसरी परिसरातील इंद्रायणीनगर, बालाजीनगर झोपडपट्टी, चक्रपाणी वसाहत, आदीनाथ नगर आदी भागात राहणा-या नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी घुसले. रात्रभर नागरिकांना घरातील पाणी बाहेर काढावे लागल्याने त्यांची तारांबळ झाली. त्यामुळे नागरिकांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. त्याची आयुक्त शेखर सिंह यांनी दखल घेतली असून आपत्ती निवारणाच्या दृष्टीकोनातून आढावा घेण्यास त्यांनी सुरुवात केली आहे.

# यवत येथे सुप्रिया सुळे यांचे जंगी स्वागत

## निवडून आल्यानंतर पहिल्यांदाच सुप्रिया सुळे इंदापूर दौऱ्यावर, पंचक्रोशीतील नागरिकांची गर्दी : जाहीर सत्कार

**पुणे | प्रतिनिधी**

खासदार म्हणून निवडून आल्यानंतर पहिल्यांदाच सुप्रिया सुळे इंदापूर दौऱ्यावर असताना दौंड तालुक्यातील जनतेने नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे यांचा दौंड तालुक्यात ठिकठिकाणी जाहीर सत्कार केला.

यामध्ये यवत गावासह भरतगाव, कासुर्डी, लडकतवाडी, नाथाचीवाडी, राहू, पिंपळगाव,खुटबाव भांडगाव, खोर येथील नागरिकांनी यवत येथील काळभैरवनाथ मंदिरामध्ये डीजे व फटाक्यांचे आतीशबाजी करत जंगी स्वागत केले.

बारामती लोकसभा निवडणुकीत दौंड तालुक्यातून २४ हजारांचे मताधिक्य घेऊन सुळे यांनी आघाडी घेत सुनेत्रा पवार यांचा पराभव केला. शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पवार म्हणाले की, सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली याबद्दल सर्व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले.



### सुप्रिया सुळे करणार उपोषण

» रयत शेतकरी संघटनेचे बापूसाहेब देशमुख यांनी दूध दरवाढ, कांद्यासाठी हमीभावाची मागणी केली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी जर सरकारने दूध दरवाढ व कांद्यासाठी हमीभाव जाहीर केली नाही तर मी व माझ्यासह लोकसभा मतदारसंघातील असंख्य कार्यकर्ते उपोषणाला बसणार असल्याची माहिती त्यांना दिली.

सहा महिने झाले कांदा, दूध व दुष्काळाचे प्रश्न गंभीर असून सरकार याबाबत काहीच बोलत नाहीत. दुधाचे भाव वाढले नाही, तर आपण लवकरच उपोषणाला बसणार आहोत, असे सुळे यांनी म्हटले आहे. तसेच केंद्र सरकार हे पक्षफोड, घरफोड व भ्रष्टाचारात व्यस्त होते, सरकारला सर्वसामान्य जनतेचे कोणतेही घेणे देणे नव्हते. दौंड तालुक्यातील सुज्ञ जनतेने २६ हजारांचे मताधिक्य देऊन विजयी केल्याबद्दल दौंड तालुक्यातील जनतेचे आभार यावेळी सुप्रिया सुळे यांनी मानले. यावेळी नामदेव ताकवणे, सोहेल खान, रामभाऊ टूले, अजित शितोळे, सचिन काळभोर, चैतन्य पाटोळे, आनंद शेलार, डॉ. वंदना मोहिते, मयूर दोरगे, आबासाहेब दोरगे, अरविंद दोरगे, काँग्रेसचे विठ्ठल दोरगे, रयत शेतकरी संघटनेचे बापूसाहेब देशमुख, पंचक्रोशीतील ग्रामस्थ व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

शशिकांत शिंदे यांच्या पराभवावर बोलताना सुळे म्हणाल्या की, शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात १० उमेदवार उभे केले होते. त्यापैकी साताराची जागा ही महत्त्वाची मानली जाते. यासाठी शरद पवार यांची संपूर्ण ताकद पणाला लागली होती. शशिकांत शिंदे यांच्या मतदारसंघांमध्ये तुतारी व पिपाणी चिन्ह होते.

### दौंडची जनता करून दाखवते

» सुप्रिया सुळे म्हणाल्या की, संपूर्ण निवडणूक जनतेने हातात घेतली होती. दौंडच्या जनतेचे शरद पवार यांच्यावर असणारे अतूट प्रेम, विश्वास त्यांनी दिलेल्या मतांच्या आघाडीमधून दिसून येते, हा विजय माझा एकट्याचा नसून दौंड तालुक्यामधील शरद पवार यांच्यावर निष्ठा, प्रेम करणाऱ्या प्रत्येक तळागाळातील कार्यकर्त्याचा आहे. दौंडची जनता सूज्ञ आहे. काही बोलून दाखवत नाही. ती करून दाखवते, असे त्यांनी सांगितले.

### साताराची जागा कॉपी करून पास

» लोकांची दिशाभूल झाली. आताच्या उमेदवाराचा विजय म्हणजे कॉपी करून पास झाले असल्याचा टोला सुळे यांनी लगावला. कट्टर शिलेदार शशिकांत शिंदे यांचा विजय व्हायला पाहिजे होता, असे सुळे यांनी आवर्जून नमूद केले.

# 14 हजार हेक्टरवर होणार सुपा मंडलाअंतर्गत उद्दिष्ट

## सुपा कृषी मंडल अंतर्गत या हंगामात शेतकऱ्यांना खते, बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध

**पुणे | प्रतिनिधी**

सुपा कृषी मंडल अधिकारी कार्यालया अंतर्गत येणाऱ्या २७ गावांमध्ये खरीप हंगामाची जय्यत तयारी केली आहे. या हंगामात प्रत्येक शेतकऱ्यांना खते व बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध होणार असून यावर्षी 14 हजार 704 हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणीचे उद्दिष्ट असल्याची माहिती सुपा प्रभारी मंडलाधिकारी बी. एच. लोदाडे यांनी सांगितले.

बारामती तालुक्यातील जळगाव सुपे, जळगा क.प., भिलारवाडी, मोढवे, सायंबाचीवाडी, पळशी मासाळवाडी, तरडोली, मोरगाव, आंबी बुद्रुक, आंबी खुर्द, भोंडवेवाडी, चांदगुडेवाडी, काळखैरेवाडी,खंडू खैरेवाडी, सुपा, दंडवाडी, नारोळी, कोळोली, पानसरेवाडी, बाबुर्डी, माळवाडी, कान्हाटी, चांदगुडेवाडी, वढाणे, कुतवळवाडी ही गावे सुपा कृषी मंडल कार्यालयाअंतर्गत येतात.



> जमिनीत चांगली ओल आल्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणी करावी व दुबार पेरणीचे संकट टाळावे तसेच बीजप्रकीया करुनच पेरणी करावी व उतार जमीनीस आडवी पेरणी करावी
>
> - प्रसाद तावरे, सहायक कृषी अधिकारी, मोरगाव.

संकरित, अधिक उत्पादन देणाऱ्या सुधारित वाणांचा पीक वाढीसाठी महत्त्वाचा वाटा ठरतो. जास्त उत्पादन देणारे, खतास चांगला प्रतिसाद देणारे, कमी कालावधीत, कमी पाण्यात येणारे तसेच रोग किडीस प्रतिकारक्षम वाण निवडावेत. तसेच प्रमाणित बियाणे वापरावे, बियाणांची उत्पादन तारीख, शुद्धता, वाणाच्या जातीचे नाव, उगवण क्षमता इत्यादी गोष्टी पाहूनच बियाणे खरेदी करावे. बियाणांची पक्की पावती, लेबल जपून ठेवावेत, पुढील काळात तक्रारीसाठी ते काम येतात.

शिफारशी प्रमाणे लागणाऱ्या सेंद्रिय रासायनिक खतांची खरेदी करून ठेवणे. बाजरी भात, मका या तृणधान्य एकदल पिकांसाठी ॲझोटोबॅक्टर, शेंगवर्गीय द्विदल पिकांसाठी रायबोजियम गटनिहाय स्फुरद वीर, जिवाणू ट्रायकोडर्मा यांची खरेदी करून ठेवावी. त्याचबरोबर शेतीसाठी लागणाऱ्या अवजारे हत्यार यांची दुरुस्ती करून ठेवावी.

### 14 हजार 704 हेक्टर जमिनीवर पेरणीचे उद्दिष्ट

» तालुक्याच्या पश्चिम भागातील ही गावे काळ्या कसदार जमीनीसाठी ओळखली जातात. खरीप हंगाम हमखास उत्पन्न मिळून देणारा म्हणून ओळखला जातो. बाजरी, सूर्यफूल, मका, भुईमूग, मूग, मटकी, हुलगा आदी पिके घेतली जातात. चारा पिकामध्ये कडवळ मोठ्या प्रमाणात घेतली जातात.खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी आपली शेतजमीन नांगरुन, कोळपून पेरणीसाठी सज्ज केली आहेत. या गावांमध्ये एकूण ३७ हजार ८०० हेक्टर क्षेत्र आहे. पैकी ३१ हजार ६९४ हजार क्षेत्र लागवड योग्य आहे. यापैकी १४ हजार ७०४ हेक्टर जमिनीवर पेरणीचे उद्दिष्ट कृषी खात्यामार्फत ठेवले आहे.